





# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक १८ । सोमवार ५ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# राम शिंदे यांच्या यू-टर्नमुळे खासदार लंके पडले एकाकी

## थोरात, गडाख, घुले यांचा वरचष्मा कायम; निवडणूक रंगतदार अवस्थेत






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी ऐनवेळी यू-टर्न घेतल्याने खासदार नीलेश लंके एकाकी पडल्याचे चित्र निर्माण झाले असून, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या गटाचे रणजीतसिंह देशमुख, शंकरराव गडाख आणि चंद्रशेखर घुले यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

जिल्हा बँकेच्या सोसायटी मतदारसंघातील १४ जागांपैकी नेवाशातून शंकरराव गडाख, शेवगावमधून चंद्रशेखर घुले (किंवा राजश्री घुले) आणि संगमनेरमधून रणजीतसिंह देशमुख यांच्या जागा अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाल्या आहेत. सभापती राम शिंदे स्वतः मैदानात उतरणार अशी चर्चा होती आणि त्यासाठी तिसऱ्या अपत्याच्या मुद्द्यावरून सवलत मिळण्याचे भाकीतही वर्तवले जात होते. मात्र, वरिष्ठ पातळीवरील राजकीय विरोध आणि कायदेशीर अडथळे लक्षात घेता, राम शिंदे यांनी माघार घेत कार्यकर्त्यांना संधी देण्याची भूमिका जाहीर केली.

या राजकीय घडामोडींमुळे खासदार नीलेश लंके यांना मोठा धक्का बसला असून ते आता पारनेर मतदारसंघापुरते मर्यादित राहण्याची शक्यता आहे. पारनेरमध्ये खासदार लंके यांच्याविरोधात विखे गटाकडून राहुल शिंदे यांची उमेदवारी अंतिम मानली जात आहे. दरम्यान, राहुरीतून मंत्री प्राजक्त तनपुरे, तर नगर तालुक्यात आमदार अक्षय कर्डिले यांच्या निवडणुकीचे चित्र अद्याप स्पष्ट असले तरी काही ठिकाणी माघारीनंतर बिनविरोधचे राजकारण रंगण्याची चिन्हे आहेत. श्रीगोंद्यात राहुल जगताप विरुद्ध प्रताप पाचपुते आणि पाथर्डीत राजळे विरुद्ध ढाकणे असा सामना रंगणार हे नक्की झाले आहे. राम शिंदे यांच्या या माघारीमुळे जिल्हा बँकेची ही निवडणूक आता अत्यंत रंजक बनली आहे.




आयुर्वेद सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी जिल्हा बँकेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी आमदार संग्राम जगताप माजी खासदार सुजय दादा विखे पाटील अविनाश घुले आदी उपस्थित होते.

# भिवंडीकडे जाणारा गुटखा पकडला; दोघे ताब्यात

## १२.८१ लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखा व अन्न औषध प्रशासनाची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिवंडी येथे विक्रीसाठी गुटखा व सुगंधित तंबाखू घेऊन जाणाऱ्या बोलेरो पिकअपवर कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखा आणि अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने दोघांना ताब्यात घेतले. नांदगाव येथील नगर-मनमाड रोडवर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत गुटखा, सुगंधित सुपारी, तंबाखू आणि बोलेरो पिकअप असा एकूण १२ लाख ८१ हजार १३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक अवैध धंद्यांची माहिती घेत असताना एमएच-०४-एमआर-२३२९ क्रमांकाच्या बोलेरो पिकअपमधून गुटखा भिवंडीकडे नेला जात असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप परशुराम पवार ■ पान ४ वर



# श्रीक्षेत्र मोहटादेवीचा शारदीय नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांच्या सोयी-सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्या

## नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोहटादेवी गडावर अध्यक्षांकडून पाहणी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी –** शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मदाय उप आयुक्त नवनाथ जगताप यांनी गडावरील विविध विकासकामांची आणि भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. याप्रसंगी नवरात्रोत्सवाच्या काळात गडावर येणाऱ्या लाखो भाविकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यादृष्टीने प्रशासनाने चोख व्यवस्था ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले.

अध्यक्ष जगताप यांनी गडावरील दर्शन रांग, पालखी मार्ग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नवीन सुरु असलेले कामे, प्रसादालय या प्रमुख ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचा आढावा घेतला. विशेषतः नवरात्रोत्सवात दहा दिवस हजारो महिला भाविक देवी गडावर घटी बसणेकामी मुक्कामासाठी राहतात. या महिला भाविकांच्या सुरक्षिततेचा विचार करून त्यांची निवास ■ पान ४ वर

# आनंदधाम येथे मंगळवारी युवती, महिलांसाठी 'अहिल्येच्या लेकी' प्रेरणादायी कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्त्री म्हणजे केवळ कुटुंबातील विविध नात्यांची ओळख नसून तिच्यामध्ये नेतृत्व, निर्णयक्षमता, संवेदनशीलता, धैर्य आणि परिवर्तन घडविण्याची शक्ती असते. याच सामर्थ्याची जाणीव महिलांना करून देण्यासाठी 'अहिल्येच्या लेकी' या विशेष महिला सक्षमीकरण उपक्रमाचे आयोजन समर्पण चातुर्मास समिति व अर्हम विद्या फाउंडेशन द्वारा करण्यात आले आहे. मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता आनंदधाम येथे हा कार्यक्रम होणार आहे. १६ ते ४५ वर्षे वयोगटातील युवती, महिलांना या कार्यक्रमात विनामूल्य प्रवेश असेल.



आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासाने उंच भरारी घेत आहे. ती कधी झाशीची राणी बनून शौर्याचे प्रतीक ठरते, कधी दुर्गा बनून संकटांशी दोन हात करते, कधी सरस्वती बनून ज्ञानाचा प्रकाश पसरवते, तर कधी जिजाऊ बनून संस्कारक्षम पिढी घडवते. कल्पना चावला बनून ती अंतराळापर्यंत पोहोचली. आज ती रिक्षा चालवते, बसची वाहक म्हणून जबाबदारी पार पाडते, इंजिनिअर, डॉक्टर, शिक्षिका, उद्योजिका, प्रशासकीय अधिकारी अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे. स्त्री आज केवळ सहभागी नाही, तर अनेक क्षेत्रांत अग्रगामी आणि नेतृत्व करणारी शक्ती बनली आहे. मात्र बाहेरच्या जगात ही उंच भरारी घेत असताना तिच्या अंतर्मनात काय सुरू आहे, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

एकाच वेळी घर, कुटुंब, नातीगोती, मुलांचे संगोपन, सामाजिक जबाबदाऱ्या आणि करिअर सांभाळताना अनेक महिलांची मानसिक ओढाताण होते. प्रत्येक भूमिका उत्तमपणे निभावण्याच्या प्रयत्नात ती अनेकदा स्वतःच्या भावनांकडे, गरजांकडे आणि मनःशांतीकडे दुर्लक्ष करते. 'सगळं सांभाळायचं' या धावपळीत कधी ती खचते, कधी एकटी पडते, तर कधी नकळत स्वतःलाच हरवून बसते. दुसरीकडे, केवळ करिअरच्या यशामागे धावताना काही वेळा नातीगोती आणि भावनिक गरजा दुय्यम ठरतात. यश मिळत असतानाही मनात निर्माण होणारी पोकळी, एकटेपणा आणि दिशाहीनता ही आजच्या सामाजिक वास्तवातील आणखी एक महत्त्वाची बाजू आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ केवळ आर्थिक किंवा व्यावसायिक स्वावलंबनापुरता मर्यादित न राहता मनाने सक्षम, भावनिकदृष्ट्या संतुलित आणि नात्यांमध्ये समृद्ध असणे हाही त्याचा महत्त्वाचा भाग आहे.

याच सामाजिक आणि मानसिक वास्तवाला समजून घेण्याचा प्रयत्न 'अहिल्येच्या लेकी' या उपक्रमातून केला जाणार आहे. 'अहिल्या बाहेर नाही तुमच्यात आहे!' हा संदेश देत महिलांना स्वतःच्या अंतर्मनातील शक्तीची पुन्हा जाणीव करून देणे, स्वतःची किंमत ओळखणे, आयुष्यातील विविध भूमिका आणि नाती यांच्यात संतुलन साधणे, आव्हानांमध्ये खंबीर राहणे आणि स्वतःकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

'जागी हो उभी राहा घडवायला सुरुवात करा!' या प्रेरणादायी विचारातून महिलांमधील नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सकारात्मक शक्ती जागृत करण्याचा ■ पान ४ वर

# हिंदूंची मंदिर पाडून उभारलेली एकही मशीद शिवाजी महाराजांनी राहू दिली नाही!

## ख्रिश्चन धर्मांतर करणाऱ्या पाद्र्यांचा शिवरायांनी शिरच्छेद करविला – प. पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदूंची श्रध्दास्थान असलेली मंदिर पाडून उभारलेली एकही मशीद छत्रपती शिवाजी महाराजांनी राहू दिली नाही! ख्रिश्चन धर्मांतर करणाऱ्या चारही पाद्र्यांना धरून आणण्याचा आदेश देऊन त्यांचा शिरच्छेद करविला, हा मूळ इतिहास जाणून घ्या, असे आवाहन प.पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले.

येथील श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टने नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे पाचवे समारोपाचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. ट्रस्टचे अध्यक्ष नंदलालजी मणियार, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनभाई पटेल तसेच सर्वश्री सुमित वर्मा, शरद झंवर, राजेंद्र चोपडा, रामेश्वर बिहाणी, अशोक कानडे, पुरूषोत्तम पटेल, मिलिंद चवंडके, प्रमोद गांधी, पुरूषोत्तम नावंदर यांच्यासह विविध भागांमधून आलेले शिवप्रेमी उपस्थित होते. नंदनवन उद्योग समूहाचे संजय जाधव यांनी स्वागताध्यक्ष या नात्याने स्वागत केले. श्री रामकृष्ण इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी म्हटलेली स्फूर्तीगीते वातावरण शिवमय करणारी ठरली.

प.पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज पुढे म्हणाले, मंदिरे पाडून उभारलेली एकही मशिद शिवाजी महाराजांनी राहू दिली नाही. याला म्हणतात समता. समता एकांगी नसावी. महाराजांनी एकाही म्लेंच्छाला पदावर ठेवले नाही, ही वस्तुस्थिती आहे. धर्मांतर करणार नाही त्याला ठार मारण्याची आज्ञा गोव्याच्या गव्हर्नरकडून काढायल्या लावलेल्या चारही पाद्र्यांना धरून आणण्याचे आदेश शिवाजी महाराजांनी दिले. मावळ्यांनी हे पाद्री धरून आणताच त्यांचा शिरच्छेद महाराजांनी करविला त्यामुळे गोव्यातील सगळे ठिकाणावर आले. गोव्यातील सप्तकोटीश्वर मंदिराचा पुनरोध्दार महाराजांनी करवून घेतला. सज्जनांना सुखी ठेवण्यासाठी दुर्जनांचा अशा पध्दतीने फडशा पाडावाच लागतो, हे शिवाजी महाराजांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

धर्मपुरूषाला दिलेल्या त्रासाचा परिणाम काय होतो? हे मिर्झाराजे जयसिंग यांची दुर्दशा पाहून लक्षात येते. मिर्झाराजांनी २३ किल्ले मोगलांना परत देण्याचा तह शिवाजी महाराजांकडून करवून घेतला होता. मिर्झाराजांचा मुलगा रामसिंग याची औरंगजेबाकडून पदावनिती झाल्याने तो खचला. तापी तीरावर त्याचा अंत झाला. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना हाल-हाल करून मारले.

निधड्या छातीच्या नरवीर तानाजी मालुसरे यांनी आधी लगीन कोंडाण्याचे मग माझ्या रायबाचे असे म्हणत कोंडाण्यावर स्वारी केली. तानाजी धारातीर्थी पडल्याने मावळ्यांच्या मनातले बळ संपले. त्यांच्या मनगटातील बळ हेरून तानाजीचे धाकटे भाऊ सूर्याजी आणि शेलार मामांनी मावळ्यांचे शौर्य दाखवून दिले. कोंडाणा जिंकून घेतला.

शिवाजी महाराजांना मोगलांच्या पाचही शाह्यांसह इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीजांशी युद्ध करावे लागले. सर्वांत वाईट म्हणजे मराठ्यांशीही युद्ध करावे लागले. छत्रपती शिवाजी महाराजांविरोधात मोगलांच्या बाजूने १८ मराठे सरदार लढले होते. शिवाजी महाराज केवळ भोसल्यांसाठी नव्हे तर हिंदू साम्राज्याकरिता युद्ध करत होते तरीही मराठे सरदार त्यांच्या विरोधात उभे राहिले. बुंदेल खंडच्या राजकुमार छत्रसाल याला शिवरायांनी पृथ्वीराज चौहानांचा आदर्श समोर ठेवून संघटन मजबूत करण्याचा सल्ला दिला. सर्वांच्या अंत:करणात प्रेरणा निर्माण करून सर्वांना जोडत रहाणे हेच खरे राष्ट्रकार्य. सावधान कार्यकर्त्यांमुळेच कार्य सिद्धीस जातात. शिवाजी महाराज शुध्द शाकाहारी धर्मपुरूष होते. महादेवांची पूजा केल्याशिवाय ते अन्न ग्रहण करत नव्हते.

इंग्रज आपले राजे नव्हेत हे उमाजी नाईक यांनी धाडसाने सांगत इंग्रजांविरुद्ध पहिले क्रांती युद्ध करून सातारा जिल्हा जिंकून घेतला. २५ वर्षे महाराष्ट्र राजा विना रडत होता. काशीचे पं.गागाभट्ट यांनी राज्याभिषेक विधान हा ग्रंथ लिहून धर्माचे, संस्कृतीचे, राष्ट्राचे पुनरुज्जीवन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घ्यावा, अशी विनंती केली. राजमाता जिजाऊंनी शिवबांना ही विनंती मान्य करण्यास सांगितल्यावर स्वराज्याची राजधानी रायगडाचे चिरेबंदी बांधकाम हिरोजी इंदुलकर यांनी केले. शिवशाहीला साजेसा दिमाखदार राज्याभिषेक सोहळा झाला. तेव्हा शिवाजी महाराजांनी हिरोजीला जवळ बोलावून गडाचे काम छान केलेस काय पाहिजे? ते माग, असे म्हटले. गडावरील जगदीश्वर महादेव मंदिराच्या पायरीला माझे नाव द्या, असे मागणे हिरोजीने मागितले. सेवेसी तत्पर हिरोजी इंदुलकर इतकेच शब्द असलेली पायरी आजही दिसते.

राष्ट्रधर्मी मराठे आणि मावळ्यांच्या बळावरच शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे ऐतिहासिक कार्य केले. ३२ मण सोन्याच्या सिंहासनावर ज्येष्ठ शुध्द ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक




लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त रांगोळी आर्टिस्ट दिनेश मंएरतकर यांनी माऊली सभागृह येथे श्रद्धांजली कार्यक्रमात लता मंगेशकर यांची उत्कृष्ट रांगोळी तयार केली.

## जनवार्ता दिवाळी अंकासाठी साहित्य १५ ऑक्टोबरपर्यंत पाठविण्याचे आवाहन

अहिल्यानगर - गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने प्रकाशित होत असलेला जनवार्ताचा दिपावली विशेषांक यावर्षीही आकर्षक स्वरूपात प्रकाशित होत आहे. या अंकात नामांकित लेखक-कवींबरोबरच नवोदित लेखक-कवींचेही साहित्य प्रकाशित होणार आहे. मान्यवर तसेच नवोदित लेखक, कवींनी आपल्या कथा, कविता, ललित लेखन, व्यंगचित्रे, चारोळ्या आदी साहित्य जनवार्ता कार्यालय, बालिकाश्रम रोड, सुडके मळा, सावेडी, अहिल्यानगर - ४१४००३ या पत्त्यावर किंवा janwarta.newspaper1@gmail.com या मेलवर दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पाठवावे, असे आवाहन संपादक पोपटराव बनकर यांनी केले आहे.

## खडांबे विद्यालयात 'वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा' प्रात्यक्षिक ट्रॅकचा शुभारंभ

अहिल्यानगर - रस्ते अपघात टाळण्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांची माहिती व्हावी, या उद्देशाने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री शाहू विद्यामंदिर, खडांबे (ता. राहुरी) विद्यालयाच्या वतीने 'वाहतूक नियम आणि रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिक ट्रॅक (मार्ग साधना)' उभारण्यात आला आहे. या प्रात्यक्षिक ट्रॅकचा शुभारंभ राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख व नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या हस्ते करण्यात आला.अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे विश्वस्त जयवंतराव वाघ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी कृषी भूषण सूरसिंगराव पवार, माजी सभापती बाळासाहेब लटके, माजी सरपंच यशवंतराव ताकटे, आबासाहेब वाघमारे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रभाकर हरिश्चंद्रे, प्रगतशील शेतकरी संजय पवार, स्कॉईन लीडर कल्हापुरे, अर्जुनराव लटके, बाळासाहेब जठार, तानाजी पवार, गुलाब पवार, रावसाहेब पवार, विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे, पर्यवेक्षक दिलीप भोरुंडे, रावसाहेब खेडकर, लक्ष्मण हरिश्चंद्रे, विशाल पारख, नानासाहेब भवार, सुखीशेठ गुगळे, अशोक उंडे आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रस्ते अपघात कमी करण्यासाठी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच वाहतूक नियमांबाबत जागृती निर्माण व्हावी, यासाठी प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण देण्याचा उपक्रम विद्यालयाने हाती घेतला आहे. यासाठी शाळेच्या परिसरात वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिक ट्रॅक उभारण्यात आला असून, या ट्रॅकवर वाहनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वाहनात बसवून रस्त्यावर दिसणारी विविध चिन्हे, वाहतूक सिग्नल, किलोमीटरचे अंतर तसेच रस्त्यालगतची गावे यांची माहिती प्रत्यक्ष कृतीद्वारे दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता वाहतूक नियमांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते भारतीय जवान व शेतकऱ्यांचा सन्मान वाढविणाऱ्या 'जय जवान, जय किसान' शिल्पाचे अनावरण करण्यात आले. या शिल्पामध्ये बैलगाडी आणि त्यामागे प्रगतशील शेतकऱ्याचे चित्र रेखाटण्यात आले आहे. त्याचबरोबर भारतीय जवानाचे चित्रही साकारण्यात आले असून, त्यातून विद्यार्थ्यांमध्ये शेतकरी व जवानांविषयी सन्मानाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.प्रास्ताविकात विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, या शाळेतून शिकलेला विद्यार्थी भविष्यात वाहतुकीचे नियम मोडणार नाही, यासाठी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे दिले जाणार आहेत. सर्वाधिक मृत्यू रस्ते अपघातांमुळे होतात. योग्य वाहतूक नियमांची माहिती असल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकते.

### समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश

# क्रीडा यशातून विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा– विकास सोनटक्के




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वाडीया पार्क येथे आयोजित विविध जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये श्री समर्थ क्रिया मंदिर (माध्यमिक) सांगळेगल्ली विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. वूशू, ज्युडो आणि कुस्ती या क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत जिल्हास्तरावर यश मिळविले असून अनेक विद्यार्थ्यांची विभागीय पातळीवर निवड झाली आहे.

वूशू जिल्हास्तरीय स्पर्धेत कु. काव्यश्री शिरापुरी व कु. सिद्धी ठोंबरे यांनी प्रथम क्रमांक मिळवत विभागीय पातळीवर आपले स्थान निश्चित केले. तसेच ज्युडो क्रीडा स्पर्धेत चि. तेजस डागवाले आणि कु. काव्यश्री शिरापुरी यांची विभागीय पातळीवर निवड झाली. कुस्ती स्पर्धेत चि. तेजस डागवाले आणि चि. अभिनव लिमगिरे यांनी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धे साठी पात्रता मिळविली. तर चि. कार्तिक काळभोर आणि चि. स्वराज खराडे यांनी जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि क्रीडा शिक्षक श्री.सतीश टकले सर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री.सुनील कानडे सर तसेच श्री. स. वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष श्री. दीपक ओहोळ, चेअरमन श्री. विकास सोनटक्के, व्हा. चेअरमन श्री. श्रीपाद कुलकर्णी, सेक्रेटरी श्री. सुरेश क्षीरसागर, सेक्रेटरी प्र. स. ओहोळ, खजिनदार श्री. संजय कुलकर्णी, सदस्य श्री. किशोर देशपांडे, श्री. वेद देशपांडे, सौ. संध्या कुलकर्णी, श्री. सुनील जोशी, श्री. सचिन क्षीरसागर, श्री. स्वप्नील सोनटक्के तसेच मंडळाचे सदस्य आणि माध्यमिक विभागाचे चेअरमन मा. श्री. स्वप्नील कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

यावेळी चेअरमन श्री. विकास सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, ''क्रीडा क्षेत्रातील यश हे केवळ पदक किंवा क्रमांकापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, जिद्द आणि संघभावना निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशातून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रगती करावी. शाळेचे नाव जिल्हा तसेच विभागीय स्तरावर उज्ज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन कायम ठेवावा. विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे यासाठी शाळेच्या वतीने आवश्यक ते प्रोत्साहन व मार्गदर्शन दिले जाईल,'' असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे श्री समर्थ क्रिया मंदिर माध्यमिक विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडून पुढील स्तरावरही दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीची आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवित तीन प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले. नवी दिल्ली येथील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित वर्ल्ड फिजिओथेरपी एशिया वेस्टर्न पॅसिफिक (डब्ल्यूपीएडब्ल्यूपी) या प्रादेशिक परिषदे दरम्यान झालेल्या विशेष समारंभात हे तीन प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आले. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) चे अध्यक्ष डॉ.संजीव झा यांच्या हस्ते संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राधा भट्टड यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच संस्थेचे प्रमुख रुग्णालय असलेल्या संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशन (एसआयओआर) ला 'टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर अवॉर्ड' आणि 'स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर अवॉर्ड हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सुमारे ७० वर्षांची परंपरा असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील आयएपी या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आलेले आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स फिजिओथेरपी शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता, वैद्यकीय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम आणि संशोधनातील योगदानाची दखल घेतात. पद्मश्री , पद्मभूषण , पद्मविभूषण आणि डॉ. बीसी रॉय पुरस्काराचे मानकरी डॉ. के. एच. संचेती यांच्या दूरदृष्टीतून १९९५ मध्ये स्थापन झालेल्या या नॅक मान्यताप्राप्त संस्थेत फिजिओथेरपी पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी. हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष रुग्णसेवेचा अनुभव देण्यावर भर दिला जातो. यामध्ये प्रमुख टर्शरी केअर रुग्णालयासह इतर रुग्णालयांमध्ये विविध विभागांमध्ये प्रशिक्षण, आधुनिक पुनर्वसन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा समावेश आहे. तसेच संशोधनासाठी विशेष प्रोत्साहन, राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख परिषदांमध्ये सहभाग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासालाही चालना मिळते.

या यशाबद्दल बोलताना संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी म्हणाल्या, ''आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ हे आमच्या गेल्या ३० वर्षांपासून सुरू असलेल्या शैक्षणिक दृष्टिकोनाला मिळालेली महत्त्वपूर्ण मान्यता आहे. सखोल वैद्यकीय प्रशिक्षण, उपचारांच्या परिणामांवर आधारित संशोधन आणि आधुनिक पुनर्वसनशास्त्राचा शिक्षणात सुरुवातीपासूनच समावेश, या आधारांवर आमची शिक्षणपद्धती विकसित झाली आहे.

सर्वोत्कृष्ट महाविद्यालय'' हा पुरस्कार आमच्या संस्थेच्या जडणघडणीत आणि विकासात योगदान देणाऱ्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांची दखल घेणारा आहे.

# देवदैठणमध्ये पाच शेतकऱ्यांच्या विहिरींवरील मोटारी व स्टार्टरची एकाच रात्री चोरी

### दुष्काळाच्या संकटात मोटार चोरीने शेतकरी मेटाकुटीला; चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री पाच शेतकऱ्यांच्या विहिरींवरील पाण्याच्या मोटारी व स्टार्टर पेट्या चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतीच्या सिंचन व्यवस्थेवरही मोठा परिणाम झाला आहे.

चोरट्यांनी इंद्रभान वाघमारे यांच्या विहिरीवरील स्टार्टर पेटी व मोटर, सदाशिव नारायण कौठाळे यांची मोटर व स्टार्टर पेटी, अमोल जाधव यांची तीन एचपीची मोटर, दगडू कौठाळे यांची स्टार्टर पेटी व मोटर तसेच संतोष पाराजी कौठाळे यांची स्टार्टर पेटी व मोटर चोरून नेली.

एकाच रात्री पाच शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत मोटारी व स्टार्टर चोरीला गेल्याने ही घटना नियोजनबद्ध असल्याची शक्यता शेतकऱ्यांकडून



व्यक्त केली जात आहे. या चोरीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, पुन्हा नवीन मोटर व स्टार्टर खरेदी करण्याचा अतिरिक्त आर्थिक भार त्यांच्यावर पडणार आहे.

**दुष्काळात मोटार चोरीचा दुहेरी फटका**

सध्या परिसरात पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थितीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शेतीला पाणी देण्यासाठी आवश्यक असलेल्या मोटारीच चोरीला गेल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. एकीकडे दुष्काळाचे संकट आणि दुसरीकडे शेतीतील साहित्य चोरी, अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. देवदैठण परिसरातील शेतांमध्ये रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी, मोटर चोरीच्या घटनांचा तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा आणि चोरीला गेलेल्या मोटारी व स्टार्टरचा तपास करून संबंधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. एकाच रात्री पाच ठिकाणी चोरी झाल्याने पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन मोटार चोरीमागील टोळीचा शोध घेणे गरजेचे आहे, अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

या भागामध्ये अनेक वेळा रात्री बिबट्याने पाळीव शेळ्या मेंढ्यांवर हल्ले केले आहेत त्याचा मोबदला शेतकऱ्यांना भेटला नाही त्यानंतर कांदा चाळीतले कांदा चोरीला गेलेला आहे त्यात आता विहिरीतील मोटर व स्टार्टर चोरीला जात आहे त्यामुळे शेतकऱ्याला अनेक संकटाला सामोरे जावं लागत आहे.

# विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाच्या वतीने १० ऑक्टोबरला सामुदायिक श्राद्ध, तर्पण विधी पूजनाची व्यवस्था

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भाद्रपद महिन्यातील संपूर्ण वद्य पक्ष हा पूर्वजांसाठी समर्पित असतो. या पक्षात पितरांचे स्मरण करून त्यांचे पूजन केले जाते. सर्व पित्री अमावस्येच्या दिवशी पूर्वजांचे ऋण फेडण्यासाठी त्यांच्या नावाने श्राद्ध विधी करणे आवश्यक असते.



या पार्श्वभूमीवर सर्व हिंदू समाज बांधवांसाठी विश्व हिंदू परिषद प्रणित मंदिर, अर्चक,पुरोहित आयामाच्या* वतीने लालटाकी रोडवरील *खाकीदास बाबा मठ* येथे शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत सामुदायिक श्राद्ध, तर्पण (पितरांचे पूजन) चे आयोजन करण्यात आले आहे.

पूजेसाठी सोबत काय आणावे : तांब्या, ताम्हण, पळी, फुलपात्र, तुळशीची पाने, पूर्वजांचा फोटो, बसकर, नॅपकीन. पूजेसाठी लागणारे इतर सर्व साहित्य विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामा तर्फे मोफत दिले जाणार आहे.

हिंदू बांधवांनी या पवित्र कार्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन पुण्य लाभ घ्यावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री अनिल जोशी,मंदिर,अर्चक, पुरोहित,आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे,

जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत नांदापूरकर व जिल्हा सह-प्रमुख हरीभाऊ डोळसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर यांनी केले आहे.

अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क :- हरिभाऊ डोळसे (माळीवाडा)-मो.९८२२२७१८०७ - गजेंद्र सोनवणे (नालेगाव) -मो.९४२२७२७७२६ - मुकुल गंधे (सावेडी उपनगर) -मो.९८९०३३६७७७ - ॲड. सचिन पाठक गुरुजी (सावेडी)-मो. ९५११११११६२,श्रीकांत नांदापूरकर (पाईपलाईन रोड) - ७०२०७५४७६१,अमोल भांबरकर (कल्याण रोड)-मो. ७९७२००१९३४,अरुण खिची (केडगाव) -मो.७२६३९००००६,मिलिंद मोभारकर (बालिकाश्रम रोड)-मो. ९९२३००२४४७ यांच्याशी संपर्क साधावा.

# ज्ञानेश कुमार यांच्यावरील प्रश्नचिन्ह

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत निवडणूक आयोगाला अत्यंत महत्त्वाचे आणि संवेदनशील स्थान आहे. सत्तेचा वापर कोण करणार, कोण विरोधात राहणार आणि जनतेचा कौल कोणाला मिळणार, याचा निर्णय शेवटी मतदानातून होतो. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेवर जनतेचा विश्वास अबाधित राहणे ही केवळ घटनात्मक गरज नसून लोकशाहीच्या अस्तित्वाची पूर्वअट आहे. अशा परिस्थितीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीभोवती निर्माण झालेली चर्चा आणि प्रश्नचिन्ह गंभीरपणे पाहण्याची गरज आहे.

ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळात निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाची म्हणजेच प्रक्रियेची अंमलबजावणी केली. मतदार याद्या अद्ययावत करणे, बोगस किंवा अपात्र नावे दूर करणे आणि पात्र नागरिकांची नावे कायम ठेवणे हा अशा प्रक्रियेचा मूलभूत उद्देश आहे. हा उद्देश तत्त्वतः योग्य असला, तरी त्याची अंमलबजावणी पारदर्शक, सर्वसमावेशक आणि नागरिकांना सहज समजेल अशा पद्धतीने होणे आवश्यक आहे.

याच ठिकाणी ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील आयोगावर प्रश्न उपस्थित झाले आहेत. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत किमान १४ वेळा काही निर्णयांवर लेखी आक्षेप नोंदवले. काही निर्णय त्यांच्या संमतीशिवाय किंवा पुरेशी माहिती न देता घेण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. हे आरोप खरे आहेत की नाहीत, याचा अंतिम निर्णय संबंधित कागदपत्रे आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच व्हायला हवा; मात्र निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या अंतर्गत मतभेदांची माहिती सार्वजनिक चर्चेत येणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

लोकशाहीमध्ये मतभेद असणे चुकीचे नाही. उलट, तीन सदस्यांच्या आयोगात वेगवेगळे मत असणे ही संस्थात्मक लोकशाहीचीच खूण आहे. प्रश्न हा आहे की त्या मतभेदांवर संस्थात्मक पद्धतीने चर्चा झाली का? प्रत्येक निर्णयाची नोंद पारदर्शकपणे झाली का? सर्व आयुक्तांना समान माहिती आणि निर्णयप्रक्रियेत समान भूमिका मिळाली का? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे जनतेसमोर येणे गरजेचे आहे.

प्रक्रियेबाबतही मोठी चर्चा सुरू आहे. मतदार याद्यांमधून मोठ्या प्रमाणावर नावे वगळली गेल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. दुसरीकडे, निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की मतदार याद्यांची शुद्धता राखण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेनुसार ही कार्यवाही केली जात आहे. त्यामुळे येथे राजकीय आरोप आणि प्रशासकीय वस्तुस्थिती यांच्यात फरक करणे आवश्यक आहे. कोणाचे नाव चुकीने वगळले गेले असल्यास त्या नागरिकाला सहज, जलद आणि विनामूल्य पद्धतीने आपले नाव पुन्हा समाविष्ट करून घेण्याची संधी मिळणे ही आयोगाची जबाबदारी आहे.



**शरद दारकुंडे सर**
ग्रामीण राजकीय अभ्यासक तथा राजकीय विश्लेषक

लोकशाहीतील सर्वात मोठे शस्त्र म्हणजे मत. गरीब असो वा श्रीमंत, शेतकरी असो वा कामगार, विद्यार्थी असो वा उद्योजकप्रत्येक पात्र नागरिकाच्या मताला समान मूल्य आहे. त्यामुळे मतदार यादीतील एखादी चूक केवळ प्रशासकीय चूक राहत नाही; ती नागरिकाच्या लोकशाही अधिकाराशी संबंधित बाब बनते.

ज्ञानेश कुमार यांच्या संदर्भातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबत निर्माण होणारे प्रश्न. निवडणूक आयोग कोणत्याही राजकीय पक्षाच्या दबावापासून मुक्त आहे, असा जनतेचा ठाम विश्वास असणे आवश्यक आहे. आयोगाच्या निर्णयांवर राजकीय पक्ष टीका करणारच; पण त्या टीकेला उत्तर देताना आयोगाने अधिकाधिक तथ्ये, आकडे, नियम आणि कागदपत्रे सार्वजनिक करणे हीच सर्वोत्तम पद्धत आहे. 'आम्ही कायदेशीर पद्धतीने काम करीत आहोत' एवढे सांगणे पुरेसे नाही; नागरिकांना ते काम प्रत्यक्षात पारदर्शक दिसले पाहिजे.

या पार्श्वभूमीवर ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होणे म्हणजे त्यांना दोषी ठरविणे नव्हे. प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा अधिकार आहे आणि त्या प्रश्नांना तथ्यांच्या आधारे उत्तर देणे ही घटनात्मक संस्थांची जबाबदारी आहे. अलीकडे या वादावर सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल झाली असून, त्यात आयोगाच्या कार्यपद्धती आणि प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. न्यायालयीन परीक्षणामुळे या विषयातील कायदेशीर पैलू अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने काही प्रक्रियांबाबत पुनरावलोकनाची पावले उचलली असल्याचेही वृत्त आहे. मतदार यादीशी संबंधित तांत्रिक प्रक्रियेची तपासणी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आल्याचे आणि काही ठिकाणी नागरिकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून पडताळणी करण्याच्या उपाययोजना करण्यात आल्याचे वृत्त आहे. याचा अर्थ असा की निर्माण झालेल्या प्रश्नांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे, असे सरसकट म्हणता येणार नाही.

मात्र, लोकशाही संस्थांबाबत विश्वास निर्माण करणे आणि तो टिकवून ठेवणे ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा स्वतःची घटनात्मक भूमिका मोठी मानली पाहिजे. सत्ताधारी पक्षाला जे लागू होते तेच विरोधी पक्षालाही लागू झाले पाहिजे आणि सामान्य नागरिकालाही समान न्याय मिळाला पाहिजे. निवडणूक आयोगाची निष्पक्षता केवळ निष्पक्ष असण्यापुरती मर्यादित नसून ती निष्पक्ष दिसली पाहिजे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ज्ञानेश कुमार यांच्यावरील प्रश्नचिन्हाचे खरे उत्तर आरोप-प्रत्यारोपांत नाही, तर पारदर्शक चौकशी, सार्वजनिक माहिती, घटनात्मक प्रक्रिया आणि न्यायालयीन परीक्षणातून मिळेल. त्यांच्या विरोधातील प्रत्येक आरोप सत्य आहे असे मानणे जितके चुकीचे आहे, तितकेच सर्व प्रश्न राजकीय हेतूने प्रेरित आहेत असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणेही योग्य नाही.

आज गरज आहे ती व्यक्तीच्या बाजूने किंवा विरोधात उभे राहण्याची नव्हे, तर संस्थेच्या बाजूने उभे राहण्याची. ज्ञानेश कुमार असोत किंवा कोणतेही अन्य अधिकारीलोकशाहीतील पद मोठे असते, व्यक्ती नव्हे. निवडणूक आयोगावरील विश्वास हा कोणत्याही एका व्यक्तीच्या प्रतिष्ठेपेक्षा मोठा आहे.

शेवटी एकच प्रश्न महत्त्वाचा ठरतोभारतीय मतदाराला आपल्या मताची किंमत आणि आपल्या मतदार ओळखीची सुरक्षितता याबाबत पूर्ण विश्वास आहे का? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे मिळणे हीच निवडणूक आयोगाची खरी कसोटी आहे. ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळावर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह दूर करण्यासाठी आरोपांना राजकीय उत्तर देण्यापेक्षा तथ्यांना संस्थात्मक उत्तर देणे आवश्यक आहे. कारण लोकशाहीत निवडणूक आयोगावरील विश्वास डळमळीत झाला, तर त्याचा परिणाम केवळ एका अधिकाऱ्यावर होत नाही; तो संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवर होतो.

म्हणूनच आज गरज आहेनिष्पक्षतेची, पारदर्शकतेची आणि जनतेच्या मताच्या अधिकाराबद्दल पूर्ण संवेदनशीलतेची. प्रश्न विचारले जात आहेत; आता त्यांची स्पष्ट, तथ्यपूर्ण आणि विश्वासार्ह उत्तरे देण्याची जबाबदारी संबंधित घटनात्मक संस्थांची आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### संदेश जाधवची जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत सुवर्ण झेप



अहिल्यानगर - नेवासा फाटा येथील दादासाहेब घाडगे पाटील विद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत निमगाव वाघा (ता. नगर) येथील संदेश नवनाथ जाधव याने आपल्या दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संदेश जाधव याने १९ वर्षे वयोगटातील ९७ किलो वजनगटात प्रतिस्पर्ध्यांना चुरशीची लढत देत उत्कृष्ट कामगिरी केली. ताकद, चपळाई आणि कुस्तीतील डावपेचांचा प्रभावी वापर करत त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. संदेश जाधव हा निमगाव वाघा येथील रहिवासी असून, तो टाकळी खातगाव येथील हनुमान विद्यालयात इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच कुस्तीच्या सरावावर सातत्याने लक्ष केंद्रित करत त्याने जिल्हास्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आता पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेतही दमदार कामगिरी करण्याचे त्याचे ध्येय आहे.पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करमाळा (जि. सोलापूर) येथे करण्यात आले आहे. संदेश जाधव याला नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे तसेच क्रीडा शिक्षक मिलिंद थोरे यांचे मार्गदर्शन लाभत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली संदेश सातत्याने सराव करत आहे. संदेशच्या या यशाबद्दल हनुमान विद्यालयाचे प्राचार्य बाकसे तसेच विद्यालयातील शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले.

### ‘लोकशाही संविधान सैनिकांचा जनसन्मान’

अहिल्यानगर - लोकशाही आणि भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी शांततामय व घटनात्मक मार्गाने संघर्ष करणाऱ्या नागरिकांना ‘लोकशाही संविधान सैनिक’ म्हणून जनसन्मान देण्याची संकल्पना पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या माध्यमातून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी मांडली आहे. ‘वुई द पीपल ऑफ इंडिया आम्ही भारताचे लोक’ या लोकसंकल्पातून अशा नागरिकांचे योगदान पिढ्यान्पिढ्या स्मरणात ठेवावे आणि त्यांच्या कार्यातून संविधाननिष्ठ ‘संपूर्ण क्रांती’ची प्रेरणा देशभर पोहोचावी, अशी या उपक्रमाची व्यापक भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.दिल्लीतील जंतरमंतरपासून शहरांच्या गल्लीबोळांपर्यंत आणि गावांच्या वाड्यावस्त्यांपर्यंत लोकशाहीच्या संरक्षणासाठी आवाज उठविणारे नागरिक या जनसन्मानाच्या केंद्रस्थानी असतील. निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता, लोकशाही संस्थांची स्वायत्तता, नागरिकांचे अधिकार आणि सार्वजनिक सत्तेचे उत्तरदायित्व यांसाठी अहिंसक आंदोलन, सत्याग्रह आणि लोकजागृती करणाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्याचा संकल्प या संकल्पनेतून व्यक्त करण्यात आला आहे.‘संपूर्ण क्रांती’ म्हणजे नागरिकांच्या विचारात, आचरणात, सामाजिक संबंधांत आणि शासनव्यवहारात संविधानिक मूल्ये रुजविण्याचा सततचा लोकप्रयत्न. सत्तेवरील व्यक्ती बदलण्याबरोबरच सत्तेच्या वापरातील मनमानी, भेदभाव, भ्रष्टाचार आणि जनतेप्रती असलेली उदासीनता दूर करण्यासाठी जागरूक नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये प्रत्येकाच्या प्रत्यक्ष जीवनाचा आणि सार्वजनिक निर्णयांचा आधार बनावीत, असा या लोकसंकल्पाचा आशय आहे.सार्वजनिक संस्थांना आणि पदाधिकाऱ्यांना प्रश्न विचारणे, त्यांच्या निर्णयांची चिकित्सा करणे आणि पारदर्शकतेची मागणी करणे ही जागरूक नागरिकांची लोकशाहीतील महत्त्वाची भूमिका आहे. लोकहितासाठी जबाबदारीने आवाज उठविणाऱ्या नागरिकांच्या योगदानाची समाजाने दखल घ्यावी, असे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले आहे. या जनसन्मानाचा आधार नागरिकांची शांततामय कृती, सत्यनिष्ठा आणि संविधानाशी निष्ठा असेल. आंदोलनातील योगदानाचे मूल्यमापन जात, धर्म, पक्ष किंवा सामाजिक प्रतिष्ठेवरून करण्याऐवजी नागरिकांचे अधिकार आणि सार्वजनिक हित यांसाठी केलेल्या कार्यावरून व्हावे, अशी या संकल्पनेची भूमिका आहे.

## हॉटेल व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला; मुख्य आरोपी २४ तासांत गजाआड

**शिरूरमधून बेलवंडी पोलिसांनी श्रीधर ठोंबरेला केली अटक; अन्य आरोपींचा शोध सुरू**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**बेलवंडी–** येवती (ता. श्रीगोंदा) परिसरात हॉटेल व्यावसायिकावर फावडे व कोयत्याने प्राणघातक हल्ला करून रोख रक्कम व मोबाईल हिसकावून नेल्याच्या गंभीर प्रकरणातील मुख्य आरोपीला बेलवंडी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. श्रीधर बाळू ठोंबरे (रा. येवती, ता. श्रीगोंदा) याला शिरूर येथून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे या प्रकरणातील इतर फरार आरोपींच्या शोधाला वेग आला आहे.

ढवळगाव येथील २६ वर्षीय हॉटेल व्यावसायिक आदेश सुरेश आढाव हे येवती परिसरात असताना आरोपींनी त्यांना अडवून पैशांची मागणी केली. यावेळी वाद झाल्यानंतर आरोपींनी आढाव यांच्यावर हल्ला केला. फावड्याने डोक्यात वार करण्यात आला, तर कोयत्याच्या मुठीने पाठीवर मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

हल्ल्यात जखमी झाल्यानंतर आढाव यांच्याकडील रोख रक्कम व मोबाईल फोन बळजबरीने घेण्यात आला. तसेच लाठ्या-काठ्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत आरोपी घटनास्थळावरून पसार झाल्याचे पोलिसांत दाखल तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात श्रीधर बाळू ठोंबरे, प्रतीक सोबले, रोहन चोरमले (सर्व रा. येवती, ता. श्रीगोंदा) आणि वैभव झिटे (रा. गुनाट, ता. शिरूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ११९(१), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपींचा शोध घेण्यासाठी बेलवंडी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. मुख्य आरोपी श्रीधर ठोंबरे हा शिरूर परिसरात लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने शिरूर येथे जाऊन कारवाई केली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत अटक केली.

दरम्यान, या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू असून त्यांच्याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस हेड कॉन्स्टेबल गाडीलकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब क्षीरसागर, पोलीस हेड कॉन्स्टेबल भाऊसाहेब यमगर, पोलीस नाईक शरद गांगर्डे, पोलीस कॉन्स्टेबल विनोद पवार व भापकर यांच्या पथकाने सहभाग घेतला.

## मराठीचा अभिमान बाळगा पण इतर भाषांचा द्वेष नको – प्राचार्य बाळासाहेब खिलारी



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पारनेर–** ढोकेश्वर विद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा मराठी भाषेची खरी ताकद तिच्या शब्द संपत्तीत, भावनेत, आणि माणसांना जोडण्याच्या समर्थ्यात आहे. म्हणून प्रत्येकाने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे पण त्याच वेळेस इतर भाषांचा द्वेष करता कामा नये असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर: मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्या निमित्ताने ढोकेश्वर विद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य बाळासाहेब खिलारी होते. प्रथम विद्यालयात ज्ञानेश्वरीची ग्रंथ दिंडी टाळ मृदूंगाच्या गजरात काढण्यात आली. नंतर वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कु.प्रियल झावरे, कु.आराध्या कडुस्कर, कु.समृद्धी जांभळकर यांनी मराठी भाषेचे वैभव, संस्कृती व वारसा याबद्दल भाषण केले. प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी मराठी भाषे विषयी गीत सादर केले. पारनेर येथील बी. एड कॉलेज चे छात्र अध्यापक सुदेश मुंढे यांनी बासरी वादन व गितगायन सादर केले. तन्वी गोरडे व वैष्णवी चव्हाण यांनी मराठी भाषेविषयी गीत सादर केले. रोनित कटारिया याने संत ज्ञानेश्वर व श्रीपाद मुंडे याने संत तुकाराम यांची भूमिका सादर केली. तसेच या प्रसंगी जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथे छत्रपती शिवराय भेदीक शाहीरी राज्यस्तरीय मेळाव्यात शाहीरआणि आदर्श शिक्षक आण्णासाहेब चौरे गुरुजी यांना कै. आमदार धोंडिभाऊ पिंगट स्मृती जीवन गौरव पुरस्कार मिळाला त्याबद्दल विद्यालयात आण्णासाहेब चौरे गुरुजी यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, अतुल सैद, बाबासाहेब जाधव, मराठी विषय शिक्षक रवींद्र मते, सुमन वाळुंज, विश्वासराव मॅडम, वायदंडे सर, प्रिया डव्हणे, रुपाली घोलप, शिर्के मॅडम, प्रा. भाऊसाहेब हिंगडे व विद्यालयातील इतर सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपूर्ण नियोजन मराठी विषयाच्या ज्येष्ठ शिक्षिका कल्पना जाधव यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना जाधव यांनी केले तर आभार सुरेखा ठाणगे यांनी मानले.

## एसआयआर विरोधावरून प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आक्रमक

**ठाकरे बंधूंच्या गर्जना मोर्चावर जोरदार पलटवार**



**मुंबई–** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत प्रक्रियेवर मांडलेल्या भूमिकेचा व्हिडिओ शेअर करत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ठाकरे बंधूंच्या गर्जना मोर्चावर जोरदार पलटवार केला आहे.
प्रक्रियेला विरोध करणाऱ्या राजकीय नेत्यांना आणि पक्षांना त्यांनी थेट सवाल केले आहेत.
गृहमंत्र्यांचे संसदेतील मुद्दे अधोरेखित करत प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे विरोधकांना खालील सवाल विचारले:

देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री कोण असावे, हे घुसखोरांनी ठरवायचे का ? तसे झाले तर लोकशाही सुरक्षित राहील का ?
एका मतदाराला एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदान करण्याची मुभा असावी का ?
मृत्यू पावलेल्या नागरिकांना मतदार यादीत स्थान असावे का ?
प्रक्रियेला विरोध करणाऱ्यांनी आधी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि नंतरच विरोध करावा, असे थेट आवाहन रविंद्र चव्हाण यांनी या वेळी केले.

## बेलवंडी पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी!

**तांत्रिक तपासाच्या आधारे १४ हरविलेले मोबाईल शोधून मूळ मालकांना केले परत**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**बेलवंडी–** नागरिकांचे विविध ठिकाणी हरविलेले तब्बल १४ मोबाईल फोन तांत्रिक तपासाच्या आधारे शोधून काढत ते मूळ मालकांच्या स्वाधीन करण्याची उल्लेखनीय कामगिरी बेलवंडी पोलिसांनी केली आहे. शोधून काढलेल्या मोबाईलची एकूण किंमत सुमारे २ लाख ५० हजार रुपये असून यामध्ये आणि या नामांकित कंपन्यांच्या मोबाईलचा समावेश आहे. बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल फोन हरवल्याबाबत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेत तांत्रिक पद्धतीने तपास सुरू केला. क्रमांक, प्रणाली तसेच उपलब्ध तांत्रिक माहितीच्या आधारे हरविलेल्या मोबाईलचा मागोवा घेण्यात आला. तांत्रिक तपासादरम्यान विविध ठिकाणी वापरात असलेले १४ मोबाईल फोन शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. त्यानंतर संबंधित मोबाईलच्या मूळ धारकांची ओळख पटवून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. पडताळणीनंतर सर्व मोबाईल फोन त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. पोलिसांनी शोधून काढलेल्या १४ मोबाईल फोनची अंदाजे किंमत २ लाख ५० हजार आहे. मोबाईल परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी बेलवंडी पोलिसांचे आभार मानले. हरविलेल्या मोबाईलचा तांत्रिक तपास करून त्याचा शोध घेणे आणि तो पुन्हा नागरिकांच्या स्वाधीन करणे, ही कारवाई पोलिसांच्या तांत्रिक कौशल्यासोबतच तत्पर व नागरिकाभिमुख कार्यपद्धतीचे उदाहरण ठरली आहे. ही कारवाई बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर व पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार कोठावळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सायबर विभागाचे कामकाज पाहणारे पोलीस कॉन्स्टेबल फिरोज तांबोळी यांनी तांत्रिक तपासाच्या माध्यमातून मोबाईल शोधण्यासाठी विशेष प्रयत्न केले. १४ मोबाईल अंदाजे किंमत २.५० लाख मूळ मालकांना परत केले.

## ’हनुमान अंश’प्रमाणे ‘नमो सेवा गाथा’ही रेकॉर्ड करेल

**रविंद्र चव्हाण यांचा विश्वास ‘नमो सेवा अनसुनी कहानियाँ’ पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रात शुभारंभ**

**मुंबई –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात ‘सेवा संकल्प अभियान’राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनप्रवासातील सेवाभाव, समर्पण, राष्ट्रभक्ती आणि सुशासनाची प्रेरणादायी गाथा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.
या अभियानाअंतर्गत ‘नमो सेवा अनसुनी कहानियाँ या पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रातील शुभारंभ मुंबईतील केसी महाविद्यालय येथे भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पथनाट्य सादर करणाऱ्या कलाकारांचा आणि संयोजकांचा सत्कार करण्यात आला.
पंतप्रधान मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील संघर्ष, सेवाभाव, राष्ट्रनिष्ठा आणि जनसेवेचा प्रवास पथनाट्याच्या माध्यमातून प्रभावी पद्धतीने जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. पिंपरी-चिंचवडमधील कलाकार पथनाट्याद्वारे




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग महाराष्ट्राच्या विविध भागांत सादर करणार आहेत. १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात एक मोठा प्रयोग, तर प्रत्येक विधानसभा क्षेत्रात किमान १० पथनाट्य प्रयोग आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर हे पथनाट्य सादर होणार असून, नवोदित कलाकारांना या माध्यमातून जनजागृती आणि सामाजिक संदेश देण्याची संधी मिळणार आहे.
‘‘आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या चरित्रातून आपल्याला सेवाभाव, सुशासन, समर्पण आणि राष्ट्रभक्तीची शिकवण मिळते. त्यांच्या जीवनातील असे प्रेरणादायी क्षण पथनाट्याच्या माध्यमातून जनमानसात रुजविण्यासाठी ‘नमो सेवा गाथा’ हा स्तुत्य उपक्रम आहे. ‘हनुमान अंश’ या नवोदित कलाकारांच्या चित्रपटाने ज्याप्रमाणे रेकॉर्ड निर्माण केले, त्याचप्रमाणे ‘नमो सेवा गाथा’ हे पथनाट्य देखील रेकॉर्ड करेल‘‘ असा विश्वास यावेळी रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.
या शुभारंभ सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष आ. राहुल नार्वेकर, भाजपचे मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. अमित गोरखे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चणकवाडीत दुष्काळी परिस्थितीचा पंचनामा

**महसूल, कृषी व ग्रामपंचायत प्रशासनाकडून पाहणी; शेतकऱ्यांच्या नुकसानीची नोंद**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**पैठण–** चणकवाडी येथे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी व ग्रामपंचायत प्रशासनाच्या पथकाने शेतशिवारात जाऊन दुष्काळी परिस्थितीचा पंचनामा केला. यावेळी पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती घेण्यात आली.

यावेळी महसूल विभागाचे तलाठी श्री. निकम आप्पा, कृषी अधिकारी श्री. विकास वाघमारे, ग्रामसेवक श्री. दांडगे यांनी शेतशिवाराची पाहणी केली. यावेळी सरपंच भगवानराव कबाडी, चेअरमन श्री. अनिल मगरे, बबरू कदम, संजय मस्के, हरिभाऊ माने, सतीश मगरे, अर्जुन कदम, ज्ञानेश्वर बावणे, रवींद्र ससाने, दत्ता पाचे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांवर झालेल्या परिणामाची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात आले. शासनाकडून जाहीर करण्यात येणाऱ्या दुष्काळी मदतीसाठी या पंचनाम्यांचा आधार मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या पाहणीचे स्वागत केले.

## दवंडी कारवाईची की वाळू वाहतूकदारांना सतर्क करण्यासाठी?

**नायगावात कारवाईची घोषणा; गोदापात्रात यंत्राने वाळू उपसा सुरूच असल्याचा नागरिकांचा आरोप**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** नायगाव परिसरात अवैध वाळू उपशाविरोधात ग्रामपंचायत व महसूल विभागाकडून कारवाई करण्यात येणार असल्याची सकाळी दवंडी पिटविण्यात आली. मात्र, कारवाईची पूर्वसूचना देण्यासाठीच ही दवंडी होती का, की अवैध वाळू वाहतूकदारांना सतर्क करण्यासाठी? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.
गोदापात्रातून यंत्राच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एकीकडे महसूल विभाग कारवाईच्या घोषणा करीत असताना प्रत्यक्षात अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरूच असल्याचा आरोप होत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

**कारवाईपूर्वीच ‘दवंडी’ का?**

नायगाव येथे अवैध वाळू वाहतुकीविरोधात कारवाई करून हायवा वाहने फोडण्यात येतील, अशी दवंडी देण्यात आल्याची माहिती समोर आली



आहे. मात्र, कारवाईची माहिती आधीच सार्वजनिक झाल्याने संबंधित वाळू वाहतूकदारांना वाहने हटविण्याची किंवा मार्ग बदलण्याची संधी मिळत नाही का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

**महसूल विभागाची नजर नेमकी कुणावर?**

गोदावरीच्या पात्रात यंत्राच्या सहाय्याने वाळू उपसा होत असल्याचा आरोप होत असताना महसूल विभागाची यंत्रणा नेमकी कुठे आहे? केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन कारवाई होणार का? असा प्रश्न नायगाव परिसरातील नागरिकांकडून विचारला जात आहे.
वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने अचानक आणि ठोस कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच कारवाईपूर्वी दवंडी देण्यामागचे नेमके कारण महसूल विभागाने स्पष्ट करावे, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गुरूदेवांच्या भूमीतील श्रावक संघ एकजूट, सामर्थ्यवान, शक्तीशालीच हवा – पूज्य प्रविणऋषीजी महाराज

## आनंद तीर्थ समवशरण येथे जिल्हास्तरीय जैन महासंमेलन उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पुण्यभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात रविवारी अहिल्यानगर जिल्हास्तरीय जैन महासंमेलन झाले. जिल्ह्यातील सर्व श्रावक संघांनी यात सहभागी होऊन समाजासमोरील आव्हाने, विविध प्रश्नांचा उहापोह केला. गुरूदेवांच्या आशीर्वादाने नगर जिल्ह्यात मजबूत संघ व्यवस्था निर्माण करून जैनिझमची पाळेमुळे अधिक घट्ट करण्याचा निर्धार या महासंमेलनात करण्यात आला.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा.यांच्या सान्निध्यातील चातुर्मासात झालेल्या या महासंमेलनात प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी उपस्थित होते. यावेळी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्य, महासंमेलनाचे आयोजक अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनचे संजय गुगळे यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. प्रमोद सोळंकी, अनिल गांधी, कमलेश गुंदेचा, ताराचंद डुंगरवाल, प्रणित मुथा, संकेत गुगळे आदि पदाधिकारी,डॉ. स्मिता आनंद भंडारी, सौ. नूतन गुगळे, उल्का सोळंकी, माया धोका, उपस्थित होते. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

प्रारंभी पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सात व्यसनांपासून मुक्त होण्यासाठी सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. '' मी व्यसनमुक्त जीवनाचा प्रण करत आहे. मी दारू, धूम्रपान, ड्रग, जुगार, परस्त्री गमन, वेश्यागमन, शिकार या सगळ्या व्यसनांपासून मी दूर राहील. जिनशासनाची कृपा माझ्यावर आहे. या कृपेला मी कायम पात्र राहिल''.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज मार्गदर्शनात म्हणाले, आज सर्वांनी महासंमेलनातून संघटित होण्याचे पहिले पाऊल उचलले गेले आहे. हा फक्त धार्मिक विषय नाही तर विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होण्याचा विषय आहे. नगर जिल्ह्यात ज्या गावात एकच जैन परिवार आहे, त्या परिवारालाही आपल्यात सामील करून घेतले पाहिजे. समाजात आंतरजातीय विवाह वाढत आहे. इतर समाजातून जैन परिवारात येणाऱ्या महिलांना जैन परंपरा शिकवल्या तरच पुढच्या पिढीला जैनिझम कळू शकेल. ही समाजाच्या अस्तित्वाची लढाई आहे. आपल्यात प्रशासनात काम करणारे आनंद भंडारी यांच्यासारखे बुद्धिजीवी आहेत. त्यांना नगर जिल्ह्यातील समाजाने मार्गदर्शक म्हणून निवडावे. ग्रामीण भागात जैन परिवार कमी होत आहेत. त्यांच्या उन्नतीसाठी संघाने ठोस कार्यक्रम हाती घ्यावा. जिल्ह्यातील श्रावक संघांनी धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता आपले सामर्थ्य समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या उन्नतीसाठी वापरले पाहिजे. गुरूदेवांच्या भूमीतील संघ एकजूट, सामर्थ्यवान, शक्तीशालीच हवा.

सीईओ आनंद भंडारी म्हणाले, ज्या धर्माने अहिंसा, अपरिग्रह, संयम, करूणा, तप अशी महान शिकवण दिली त्या जैन धर्माचे आपण सर्व वाहक आहोत. अहिंसेचे स्वरूप व्यापक आहे. ते फक्त शाकाहारापुरते मर्यादित नाही. महात्मा गांधी यांची सर्व आंदोलने ही अहिंसा तत्वावरच होती. मात्र आज समाजासमोर अनेक आव्हाने आहेत. यासाठी सगळ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. एकत्रित कुटुंब व्यवस्थेचा पुरस्कार केला पाहिजे. घरात आजीआजोबा असतील तरच नवीन पिढीला संस्कार मिळतील. आजकाल भौतिकवाद वाढला आहे. ही मानसिकता बदलली पाहिजे. समाजात व्यसनाधीनताही वाढत आहे. त्यावर विचार केला पाहिजे. आणखी मोठी गोष्ट म्हणजे महिलांना समाजाच्या उन्नतीसाठी सक्रिय करून घेतले पाहिजे. जैन समाजातील मुलींचा जन्मदर वाढला पाहिजे, जो तुलनेने आज कमी आहे.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखेंच्या उपस्थितीत पारनेरमध्ये ७ ऑक्टोबरला आढावा बैठक - आ. काशिनाथ दाते

## टंचाई व जलजीवन मिशनच्या कामांचा गावनिहाय आढावा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील सध्याची दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई तसेच जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या विविध कामांचा आढावा घेण्यासाठी बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, पारनेर येथे विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असून ही विशेष बैठक अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार असल्याची माहिती मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

सध्या मतदारसंघातील विविध गावांमध्ये निर्माण झालेली पाणी व चारा टंचाई आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता या बैठकीत गावनिहाय पाणी, चारा उपलब्धतेचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात येणार आहे. विशेषतः जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या योजनांचा अद्याप प्रत्यक्ष पाणीपुरवठ्यासाठी वापर का सुरू झालेला नाही, याची कारणे तपासण्यात येणार आहेत. तसेच ज्या योजना किरकोळ किंवा अल्प प्रमाणात अपूर्ण आहेत, त्या तातडीने पूर्ण करून संबंधित गावांना पाणीपुरवठा सुरू करता येईल का, याबाबतही बैठकीत चर्चा केली जाणार आहे. ज्या योजना अद्याप अपूर्ण आहेत, त्या कोणत्या कारणांमुळे रखडल्या आहेत, त्यातील अडचणी कोणत्या आहेत आणि त्या दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याचा गावनिहाय आढावा घेण्यात येणार असल्याचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सांगितले.



''पूर्ण झालेल्या योजनांचा लाभ नागरिकांना प्रत्यक्ष मिळणे आवश्यक आहे. केवळ योजना पूर्ण झाल्याची नोंद न राहता त्या योजनांच्या माध्यमातून संबंधित गावांना प्रत्यक्ष पाणी मिळावे, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यावर या बैठकीत भर दिला जाणार आहे,'' असे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सांगितले.

या आढावा बैठकीसाठी पारनेर तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी बांधव तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार काशिनाथ दाते सर यांनी केले आहे. दुष्काळी परिस्थितीत पाणीप्रश्नाला प्राधान्य देत जलजीवन मिशनच्या प्रलंबित व अपूर्ण कामांना गती देऊन प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# सन इन्डीया फिल्म प्रस्तुत मराठी–हिंदी चित्रपटासाठीच्या उद्या होणाऱ्या ऑडीशनसाठी इच्छुकांनी उपस्थित राहावे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** 'सन इन्डीया फिल्म प्रस्तुत ऑडीशन ''एक वेड एक स्वप्न मायकल जॅक्सन'' या मराठी व हिंदी चित्रपटासाठी २० ते ५० वयोगटातील कलाकारांचे ऑडीशन घेण्यात येणार आहे व त्यांना आमंत्रित करण्यात येणार आहे.
मागील यशस्वी चित्रपटानंतर ''लग्नाचे वळू'' व ''ब्रह्मान्डनायक'' तसेच ''मुंबई मेरी बाहो में'' या चित्रपटात शक्ती कपूर, रजा मुराद, मकरंद अनासपुरे, अलका कुबल व इतर हिंदी व मराठी कलाकारांनी काम केले आहे व मराठी सह्याद्रिची सिरीयल ''आनंद महिमा'' तसेच हिंदी सिरियल ''मै बनुंगी मिस इन्डीया'' या नावाची सिरीयल लखनवू दुरदर्शनवर चाललेली यशस्वी सिरियल या यशस्वी प्रोडक्शननंतर ''एक वेड एक स्वप्न मायकल जॅक्सन'' हा चित्रपट म्युझिकल व डान्सींगवरती आहे.
त्यात एका डान्सर मुलाची कहाणी व त्याच्या जीवनावर अधारीत आहे. विशेषतः डान्सर मुला–मुलींना जास्तीत जास्त प्राधान्य दिले जाईल.
वरील चित्रपटाचे शुटींग २५–१०–२०२६ पुणे येथे होणार आहे. आहे या चित्रिकरणाचा शुभारंभ भारत गणेशपुरे, ''चला हवा येऊ द्या फेम यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसेच मराठी सिरियल ''बायकोचा बैल'' या वेब सिरीजसाठी जास्तीत जास्त विनोदी कलाकार व मुले–व मुलीना संधी देण्यात येणार आहे व सर्व वयोगटातील कलाकार हवे आहेत. या दोन्ही चित्रपटासाठी अहिल्यानगरमधील कलाकारांना जास्तीत–जास्त प्राधान्य देण्यात येणार आहे.ऑडीशन उद्या मंगळवारी, दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ ते ४ माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन येथे होणार आहे. तरी इच्छुकांनी या ऑडीशनसाठी हजर राहावे, अशी माहिती सन इन्डीया फिल्मच्या संचालकांनी दिली आहे.

# अहमदनगर शहर सहकारी बँकेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात

## बँकेला ४.१५ कोटींचा निव्वळ नफा; ग्रॉस एनपीए २.५७ तर नेट एनपीए १.०३ टक्क्यांवर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**अहमदनगर शहर सहकारी बँके ची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सीए गिरीश घैसास यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली या आर्थिक वर्षात बँकेनेउत्तम आर्थिक कामगिरी नोंदवत ४ कोटी १५ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे. बँकेचा ग्रॉस एनपीए २.५७ टक्के, तर निव्वळ एनपीए १.०३ टक्क्यांवर आला असून, वसुलीसाठी करण्यात आलेल्या विशेष प्रयत्नांमुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी सांगितले. सावेडी येथील माऊली सभागृहात झालेल्या अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.
सभेच्या प्रारंभी बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी उपस्थितांचे स्वागत करून अहवाल वर्षातील बँकेच्या कामगिरीचा आढावा घेतला. शहर बँकेवरील खातेदार, ठेवीदार आणि ग्राहकांचा विश्वास सातत्याने वाढत असून, २०२५–२६ या वर्षात बँकेच्या ठेवींमध्ये तब्बल २० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. सुमारे ५५० नवीन ठेवीदार



बँकेशी जोडले गेले असून कर्जव्यवहारातही वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले.
बँकेच्या सीडी रेशोमध्ये १० टक्क्यांनी वाढ झाली असून, कर्ज वितरणामध्ये ६३ कोटी १८ लाख रुपयांची वाढ झाली आहे. अहवाल वर्षात बँकेच्या सर्व सभासदांनी संचालक मंडळ आणि प्रशासनाला चांगले सहकार्य केले, याचा आवर्जून उल्लेख चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी केला. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे यांनी विषयपत्रिकेचे वाचन करून विविध ठराव मंजुरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवले. सभासदांनी सर्व ठरावांना एकमुखाने मंजुरी दिली.
त्यानंतर झालेल्या चर्चासत्रात बँकेचे सभासद बी.एम. बांदल, रत्नाकर कुलकर्णी, बबनराव झावरे, बागडे, शिंदे, तागडे, ॲड. विनायक इंगळे आदी सभासदांनी सहभाग घेतला.

यावेळी दि अंबिका महिला नागरी सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर नव्याने नियुक्त झालेल्या संचालिका डॉ. दीपाली भूषण अनभुले, प्रा. आरती सुनील मांढरे, प्रा. शिल्पा अभिजित वाघ आणि प्रा. वैशाली किशोर मरकड यांचा शहर बँकेच्या संचालिका रेश्मा आठरे आणि स्वाती कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
बँकेचे संचालक जयंत येलूलकर यांची महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेच्या विभागीय कार्यवाहपदी निवड झाल्याबद्दल चेअरमन सीए. गिरीश घैसास यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

बँकेचे माजी संचालक सुरेश चव्हाण यांना नुकताच समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल व्हा. चेअरमन प्रा. माणिकराव विधाते यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच बँकेचे सभासद ॲड. रवींद्र शितोळे यांची लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाच्या समितीवर सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांसाठी लढा देणारे राजेंद्र चोपडा व राजेंद्र गांधी यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

## इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय येथे ७ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम : डी. एम. कुलकर्णी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय बँकिंगच्या इतिहासात अहिल्यानगरमधील नगर अर्बन मल्टिस्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेचे लायसन्स रद्द झाल्यानंतर सर्व ठेवीदारांना त्यांच्या ठेवींचे पैसे मिळवून देणे, गैरकारभार केलेल्या संचालकांवर गुन्हे दाखल करण्याचे धाडस दाखवले ते आपल्या सर्वांचे स्नेही राजेंद्रजी गांधी ६१ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. तसेच त्यांच्याबरोबर खांद्याला खांदा लावून लढणारे राजेंद्रजी चोपडा हे ७१ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. अर्बन बँक ठेवीदार व मित्रपरिवारातर्फे या दोघांचाही



अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती या सोहळ्याचे अध्यक्ष डी. एम. कुलकर्णी यांनी दिली.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, शहराचे आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून सीए एस. झेड. देशमुख हे मार्गदर्शन करणार आहेत. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान उद्योगपती श्रीगोपाल धूत, भूषवणार आहेत अशी माहिती सत्कार सोहोळा समितीचे उपाध्यक्ष भास्कर नजन यांनी दिली.

येत्या बुधवारी दि. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, कोठी रोड येथे हा सोहळा पार पडणार आहे. यावेळी त्यांच्यावर प्रेम करणार्या सर्व मित्रमंडळी, नातेवाईक यांनी सहकुटुंब, सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सत्कार सोहोळा समितीचे सचिव अवधूत कुक्कडवाल यांनी केले आहे.

# हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने लालासाहेब यादव यांचे निधन

## कारखान्यात कामावर असतानाच आला हृदयविकाराचा तीव्र झटका; उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**बेलवंडी–** तालुक्यातील आनंदवाडी येथील कै. लालासाहेब बाबुराव यादव (वय ५८) यांचे सोमवारी (दि. ५ ऑक्टोबर २०२६) सकाळी ११.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने उपचारादरम्यान दुःखद निधन झाले.



लालासाहेब यादव हे ओंकार शुगर साखर कारखाना, युनिट क्रमांक ७, देवदैठण, ढवळगाव (ता. श्रीगोंदा) येथे चालक म्हणून कार्यरत होते. सोमवारी कारखान्यात कामावर असतानाच त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने माजी सरपंच सचिन चौधरी यांनी तातडीने स्वतःच्या वाहनातून त्यांना शिरूर येथील श्री गणेशा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले.

रुग्णालयात डॉ. महाजन व डॉ. पाठक यांनी त्यांच्यावर युद्धपातळीवर उपचार करण्याचे प्रयत्न केले. मात्र हृदयविकाराचा झटका अत्यंत तीव्र असल्याने उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

लालासाहेब यादव यांच्या अचानक निधनामुळे आनंदवाडी तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच ओंकार शुगर कारखान्यातील सहकाऱ्यांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय व आप्तेष्ट असा परिवार आहे.

(पान १ वरून)

## भिवंडीकडे जाणारा गुटखा पकडला; दोघे ताब्यात

यांना माहिती देऊन नांदगाव येथील इसार पेट्रोलपंपासमोर हॉटेल खालसा पंजाबजवळ वाहनाची पंचांसमक्ष तपासणी केली. त्यात सुगंधित सुपारी, सुगंधित तंबाखू व गुटखा आढळून आला. या प्रकरणी कैफ अहमद अल्ताफ शेख (४५, भिवंडी) आणि वाजीद उर्फ गोल्डी शब्बीर शेख (२९, मध्य प्रदेश) यांना ताब्यात घेण्यात आले. तर मालाचा पुरवठा करणारे आणखी चार जण फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्रीक्षेत्र मोहटादेवीचा शारदीय नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांच्या सोयी–सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्या

आणि भोजन व्यवस्था अत्यंत सुव्यवस्थित आणि सुरक्षित असावी, यावर त्यांनी विशेष भर दिला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान देवस्थान विश्वस्त तथा गटविकास अधिकारी राजेंद्र धस, शशिकांत दहिफळे, ॲड. प्रसन्न दराडे, ॲड विक्रम वाडेकर ॲड कल्याण बडे, अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, बाळू शेठ लाहोटी, ॲड ऋतिका कराळे यांना देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी नवरात्रोत्सवात भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सर्व सोयी–सुविधांची सविस्तर माहिती अध्यक्षांना दिली. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य पथके आणि चोवीस तास दर्शन व्यवस्था याबाबत देवस्थान समितीने केलेल्या नियोजनाचा आराखडा त्यांनी सादर केला.

यावेळी बोलताना अध्यक्ष जगताप म्हणाले, ''मोहटादेवी गडावर नवरात्रोत्सवात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, ही देवस्थानची प्राथमिकता आहे. विशेषतः गडावर मुक्कामी राहणाऱ्या महिला भाविकांच्या निवासाची आणि भोजनाची व्यवस्था करताना त्यांच्या सुरक्षिततेकडे आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जावे. भाविकांच्या सुविधेसाठी प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी समन्वय राखून चोवीस तास तत्पर राहावे, जेणेकरून उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडेल.''
या पाहणी दरम्यान देवस्थान समितीचे जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, सुरक्षा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. नवरात्रोत्सवाची संपूर्ण तयारी अंतिम टप्प्यात आली असून भाविकांच्या स्वागतासाठी मोहटादेवी गड सज्ज झाला आहे.

## आनंदधाम येथे मंगळवारी युवती, महिलांसाठी 'अहिल्येच्या लेकी' प्रेरणादायी कार्यक्रम

प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे. आजच्या स्त्रीच्या या बहुआयामी जीवनाकडे केवळ एका दृष्टिकोनातून न पाहता गर्भसंस्कारापासून पॅरेंटिंग, ब्लिसफुल कपल, वैवाहिक जीवन, ध्यान–साधना ते जीवनाच्या अंतिम टप्प्यापर्यंतच्या विविध विषयांवर मार्गदर्शन करणारे आध्यात्मिक व जीवनविकासाचे उपक्रम देशभरात तसेच भारताबाहेरही घेऊन जाणारे उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.इतिहासात आपल्या कार्यातून आदर्श निर्माण करणाऱ्या लोकमाता पुण्ग्रयश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत, आजच्या महिलांनी स्वतःमधील सामर्थ्य ओळखावे आणि त्या शक्तीचा उपयोग स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि समाजाच्या सकारात्मक परिवर्तनासाठी करावा, हा या उपक्रमामागील व्यापक दृष्टिकोन आहे. अर्हम् विज्ञाच्या माध्यमातून, गुरुदेव श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणेतून आयोजित या विशेष उपक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्वतःमधील 'अहिल्येला' जागृत करावे, असे आवाहन समर्पण चातुर्मास समिति व अर्हम विद्या फाउंडेशन द्वारा करण्यात आले आहे.

## हिंदूंची मंदिर पाडून उभारलेली एकही मशीद शिवाजी महाराजांनी राहू दिली नाही!

त्रयोदशी ६ जून १६७४ ला मंगल वाद्यांच्या निनादात वेदमंत्राच्या घोषात शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न झाला, असे स्वामी गोविंददेव गिरीजी महाराजांनी सांगितले. शिवाजी महाराजांच्या जयघोषाने कथा स्थळ दुमदुमून गेले. श्री रामकृष्ण इंग्लिश मिडीयम स्कूलमधील ७५ विद्यार्थी शिवराज्याभिषेक सोहळ्यात पारंपरिक पोषाख परिधान करून सहभागी झाले होते. शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत श्री. सुमित संतोष वर्मा यांचे अश्वारूढ आगमन लक्षवेधी ठरले. पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी सर्वश्री जगन्नाथ बजाज, प्रविण बजाज, दत्ता जाधव, किरण मणियार, हिरालाल पटेल, विनोद पटेल, बाली जोशी, राजूभाई पटेल, गोपाल मणियार, रविंद्र गुजराथी, प्रदिप पंजाबी, बजरंग दरक, विजय पंजाबी, राजेंद्र खंडेलवाल, राहुल जामगांवकर, हर्षल शहा, पंकज पटेल, मुकुंद जाजू, हर्षा गुजराथी, अभाविपचे आनंद गांधी, व्यंकटेश कुलकर्णी, प्रियांका माने, रोहन भुजबळ, प्रशिक दणाणे, हार्दिक पटेल आदींसह शहरातील आणि उपनगरातील हिंदू धर्म प्रेमी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.